नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या, नागपूर (नोंदणी रद्द) उमरोड रोड, जि.नागपूर या सूतगिरणीच्या ११२४ कामगारांना रु.१०.०० कोटी इतके सानुग्रह अनुदान मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः बैठक-१५१५/प्र.क्र.५६/टेक्स-१ (अ)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
तारीख : ५ मार्च, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय समक्रमांक दि.२२.६.२०१८
२. शासन पत्र समक्रमांक दि.२३.८.२०१८
३. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे पत्र जा.क्र. कार्या-६(२)/सूतगि/११२२७/१८, दि.३०.११.२०१८

प्रस्तावना :-

नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या, नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीकडे सद्यस्थितीत गिरणीकडे एकूण २०.२० एकर जमिन शिल्लक आहे. कामगारांच्या थकित देणी देण्यासंदर्भात राष्ट्रीय मिल मजदूर संघ, मर्या, नागपूर यांनी औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे दावा क्र.१०४४/२००० दाखल करुन दि.३१.१०.२००० पर्यंत पगार व भत्ते मिळण्याबाबत विनंती केली. औद्योगिक न्यायालयाने दि.१८.१२.२००० च्या आदेशान्वये कामगारांना दि.१.९.१९९६ ते ३१.१०.२००० या कालावधीतील वेतनाची ५०% रक्कम ३० दिवसाचे आत अदा करण्याबाबत निदेश दिले. त्यानुसार सूतगिरणीची २१ एकर जमिनीची विक्री करुन कामगारांची दि.१.९.१९९६ ते ३१.१०.२००० या कालावधीची वेतनाच्या थकबाकीची ५०% रक्कम रु.१०.६५ कोटी अदा केली. तसेच औद्योगिक न्यायालयाने दि.१०४४/२००० या प्रकरणी, सूतगिरणी औद्योगिक कलह कायदा १९४९ मधील नियम २५ ओ प्रमाणे बंद करण्यात आलेली नसल्याने, कामगार हे वेतन मिळण्यास पात्र असून त्यांना उर्वरित ५०% रक्कम अदा करण्याचे आदेश दि.२३.३.२००६ रोजी दिले. औद्योगिक न्यायालयाच्या दि.२३.३.२००६ च्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र.३२३४/२००६ दाखल करण्यात आली. राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांनीही याचिका क्र.४२९५/२००६ दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाचे दि.२३.३.२००६ चे आदेश रद्दबातल करुन सूतगिरणी जो पर्यंत सुरु होती, तो पर्यंत कामगार वेतन मिळण्यास पात्र आहेत असे आदेश दिले. सदर निर्णयाविरुध्द राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांनी मा. उच्च न्यायालयात एल.पी.ए.क्र.४४७/२००९ दाखल केली असून ती न्यायप्रविष्ठ आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.९.८.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत “मा. उच्च न्यायालयाच्या

निर्णयासोबतच याबाबत सूतगिरणी कामगारांची आर्थिक स्थिती व आकस्मिकपणे सूतगिरणी बंद पडल्यामुळे त्यांना दीर्घ काळ भोगाव्या लागलेल्या समस्यांचा विचार करता, त्यांचेप्रती सहानुभूतीने विचार करण्याची आवश्यकता आहे. सन २००० पर्यंतचे कामगारांनी मागणी केलेल्या रक्कमेतून त्यांना प्राप्त झालेली रु.१०.०० कोटीची रक्कम वसूल न करता उर्वरित रु.१०.०० कोटी जमीन विक्रीतून येणाऱ्या रक्कमेतून वस्त्रोद्योग विभागाने द्यावी" असा निर्णय बैठकीत घेण्यात आला असल्याने या सूतगिरणीच्या जमिन विक्रीतून येणाऱ्या रक्कमेतून नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या, नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या ११२४ कामगारांना प्रति कामगार रु.८८९६८/- इतके असे एकूण रु.१०.०० कोटी इतकी रक्कम ही वेतन थकबाकी म्हणून न देता सानुग्रह अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या, नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या २०.२० एकर जमिन रेडी रेकनर दराने म्हाडाला विक्रीतून येणा-या रक्कमेतून नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या, नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या एकूण ११२४ कामगारांना प्रति कामगार रु.८८९६८/- (अक्षरी रुपये अठ्याअंशी हजार नऊशे अडुसष्ट फक्त) इतके असे एकूण रु.१०.०० कोटी इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या., नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या ११२४ कामगारांना सदरील सानुग्रह अनुदान देण्यापूर्वी यापुढे कामगार व कामगार संघटना कोणत्याही रक्कमेची मागणी कारणार नाही किंवा याबाबत मा.न्यायालयात कोणतीही याचिका/ अर्ज दाखल करणार नाही, अशाप्रकारचे बंधपत्र संबंधित कामगारांकडून घेण्यात यावे. तसेच याबाबत वेगवेगळ्या मा.न्यायालयात प्रकरणे दाखल/ प्रलंबित असल्यास ती कामगारांनी तथा कामगार संघटनांनी प्रथम मागे घ्यावीत व नंतरच रक्कम अदा करण्यात यावी.

३. नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी मर्या, नागपूर (नोंदणी रद्द) या सूतगिरणीच्या २०.२० एकर जमिन रेडी रेकनर दराने म्हाडाला विक्रीतून प्राप्त रक्कमेतून सूतगिरणीच्या ११२४ कामगारांना सानुग्रह अनुदान वितरीत करण्याबाबत संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी कार्यवाही करावी व त्याबातचा अहवाल शासनास पाठवावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१२०८४६२५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishal Vishvas Madane

Digitally signed by Vishal Vishvas Madane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-op Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bb0ed28a897fc87f69fe8807b3d9428966ce3233edb83a20c38834c19f2e3793, cn=Vishal Vishvas Madane
Date: 2019.03.05 17:30:32 +05'30'

(विशाल मदने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, नागपूर
१०.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
११.जिल्हाधिकारी, नागपूर
१२.अवसायक, नागपूर विणकर सहकारी सूतगिरणी, नागपूर, उमरोड रोड,नागपूर
१३. अध्यक्ष/ कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, वकील हाऊस, मुंबई
१४. निवडनस्ती (टेक्स १-अ/(टेक्स १-ब))